प्रेस प्रकाशन PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
Department of Communication, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022-22660502

वेबसाइट : www.rbi.org.in
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

जुलै 12, 2019

**नोबल को-ऑपरेटिव बँक लि. नॉयडा यु .पी.) हयांचेवर आर्थिक दंड लागु**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46(4) सह वाचित कलम 47 अ 1)(क) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व्ह बँकेने नोबल को-ऑपरेटिव बँक लि. नॉयडा यु .पी.) हयांचेवर रु 1,00,000/- (रुपये एक लाख) आर्थिक दंड लागु केला असून, तो दंड फसवणुकींचे वर्गीकरण व अहवाल हयाबाबत आरबीआयने दिलेल्या सूचना/मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन केले असल्याने लावण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती व त्यावर त्या बँकेने तिचे लेखी उत्तर सादर केले होते. हया प्रकरणातील सत्य, बँकेने दिलेले उत्तर व वैय्यक्तिक सुनावणी विचारात घेऊन भारतीय रिझर्व्ह बँकेने निष्कर्ष काढला की, उल्लंघने सिध्द होत असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**योगेश दयाल**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन : 2019-2020/131**